**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**उप मुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी) यांचे कार्यालय,**
कक्ष .क्र.२०४/२०५ पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१


==================================================

जा.क्र. उपमुअ(धापुप्र/गिरणी)/मुं.मं./ /२०२१
दिनांक :- / /२०२१.

# जाहिर सुचना

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गिरणीकामगार विभागातील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरीता मुदतवाढ देणेबाबत.**

---

कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रीय स्तरावर व राज्यस्तरावर विविध उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. त्याअनुषंगाने मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यतेने मुंबई मंडळ गिरणी कामगार विभागातील पात्र लाभार्थ्यांना दिनांक १५/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तदनंतर पुन्हा दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत व्याजाची आकारणी करण्याच्या अटीवर वाढीव मुदतवाढ देण्यात आली होती.

परंतु कोरोना महामारीच्या दुस-या लाटेचा प्रादुर्भाव पाहता महाराष्ट्र शासनाकडून २१ एप्रिल २०२१ च्या आदेशानुसार राज्यात पुन्हा टाळेबंदीचे नियम लागु करण्यात आले. त्यानुसार सामांन्याकरीता दळणवळणाची साधने प्रतिबंधीत करण्यात आली. त्यामुळे बहुतांश लाभार्थ्यांनी अर्थिक अडचणीमुळे सदनिकेची विक्री किंमत भरण्याकरीता मुतदवाढीची मागणी केली होती. त्या विचारात घेऊन मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी गिरणी कामगार सोडतीतील यशस्वी व पात्र लाभार्थ्यांना सदनिकेची विक्री किंमत भरण्याकरीता प्रचलित दराने व्याजाची आकारणी करण्याच्या अटीवर ६० दिवसांची मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे.

त्यामुळे मुंबई मंडळांतर्गत गिरणी कामगारांच्या सदनिकेच्या सोडतीमधील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरीता दिनांक २९/०९/२०२१ पर्यंत म्हाडाच्या प्रचलित प्रलंबित व्याजासह वाढीव मुदतवाढ देण्यात येत आहे.

**(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे मान्यतेने)**

डॉ. योगेश म्हसे
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई.